पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १८८। किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार ०५/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

## पद्मश्री डी. वाय. पाटील यांचे निधन



कोल्हापूर (वृत्तसंस्था) - देशातील शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे शिक्षणमहर्षी, पद्मश्री पुरस्कार विजेते आणि बिहार तसेच त्रिपुराचे माजी राज्यपाल डॉ. ज्ञानदेव यशवंतराव (डी. वाय.) पाटील यांचे मंगळवारी कोल्हापुरात वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. सोमवारी रात्री त्यांची प्रकृती खालावली होती. बुधवारी शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि समाजसेवा या क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने राज्यासह देशभरातून शोक व्यक्त केला जात आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार उच्च शिक्षण पोहोचवण्याचा त्यांनी आयुष्यभर ध्यास घेतला.

२२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील आंबप येथे एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या डॉ. पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प केला. त्यातून पुढे त्यांनी देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांचे जाळे उभारले. २२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील आंबप येथे एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या डॉ. पाटील यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प केला. त्यातून पुढे त्यांनी देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांचे जाळे उभारले.

सार्वजनिक जीवनाची सुरुवात त्यांनी काँग्रेस पक्षातून केली. १९५७ ते १९६२ या काळात ते कोल्हापूरचे महापौर होते. त्यानंतर १९६७ आणि १९७२ मध्ये पन्हाळा विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. मात्र, पुढे सक्रिय राजकारणापासून दूर जात त्यांनी संपूर्ण लक्ष शिक्षण क्षेत्राच्या उभारणीकडे केंद्रित केले.

१९८३ मध्ये नवी मुंबई येथे 'रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (ठ-खढ)'ची स्थापना करून त्यांनी शैक्षणिक प्रवासाला सुरुवात केली. पुढे त्यांच्या नेतृत्वाखाली डी. वाय. पाटील समूहाने देशभरात शिक्षणसंस्थांचे मोठे जाळे उभे केले. या समूहांतर्गत कोल्हापूर, पुणे, नवी मुंबईसह विविध शहरांमध्ये डीम्ड विद्यापीठे, खासगी विद्यापीठे आणि १८० हून अधिक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत

## एफडीआयचा आता डाबरला दणका

मुंबई (वृत्तसंस्था)

जर तुम्ही वस्तू खरेदी करताना पॅकेजिंगवर १००% शुद्ध, १००% नैसर्गिक, किंवा '१००% सेंद्रिय' असे लिहिलेले पाहून ते अधिक चांगले आहे असे समजत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. भारताची अन्न सुरक्षा नियामक संस्था अर्थात एफएसएसएआय ने डाबर इंडियाच्या अनेक खाद्य उत्पादनांवर कारवाई केली आहे. नियामकाने कंपनीला हे दावे असलेली काही उत्पादने विकणे थांबवण्याचे आदेश दिले आहेत आणि १५ दिवसांच्या आत केलेल्या कारवाईचा अहवाल मागवला आहे. एफएसएसएआयच्या या आदेशात नमूद केलेल्या उत्पादनांमध्ये मध, गाईचे तूप, मोहरीचे तेल, तिळाचे तेल, व्हर्जिन नारळ तेल, पल सायडर व्हिनेगर, नारळाचे पाणी आणि नारळाचे दूध यांचा समावेश आहे.

नियामकाच्या मते, कंपनी आपल्या काही उत्पादनांवर '१००% शुद्ध', '१००% नैसर्गिक', '१००% शुद्धतेची हमी', '१००% सेंद्रिय' आणि '१००% कोवळ्या नारळाचे पाणी' असे दावे करत होती. **FSSAI** नुसार, असे दावे अस्पष्ट आहेत, त्यांची वैज्ञानिक पडताळणी करता येत नाही आणि ते ग्राहकांची दिशाभूल करू शकतात. असे म्हटले आहे. मुख्य कारण म्हणजे, भारताचे अन्नविषयक नियम '१००%' असा दावा करण्यास परवानगी देत नाहीत. दुसरे म्हणजे, जर एखादी कंपनी '१००% शुद्ध' असे लिहित असेल, तर प्रश्न निर्माण होतो, कशाचे १००%? शुद्धतेचे, नैसर्गिकतेचे, की एकाच घटकाचे? वास्तविक पाहता, एखादे उत्पादन भेसळयुक्त आहे की नाही हे प्रयोगशाळा सांगू शकते. परंतु एखादी गोष्ट १००% शुद्ध आहे हे ती सिद्ध करू शकत नाही.

## बाळूमामा देवस्थानात तब्बल ६०.७५ कोटींचा गैरव्यवहार

### उपनिबंधकांसह तिघांवर गुन्हा



कोल्हापूर (वृत्तसंस्था)

देशभरात मंदिरांच्या व्यवस्थापनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असतानाच, महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत सद्गुरू बाळूमामा देवस्थान, आदमापूर येथे तब्बल ६० कोटी ७५ लाख २८ हजारांचा कथित आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आल्याने राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. मंदिरांमधील कथित आर्थिक अनियमिततेबाबत पुन्हा एकदा तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणी उपनिबंधक तथा तत्कालीन कार्याध्यक्ष रागिणी खडके, सचिव रावसाहेब वीराप्पा खोतकरी (रा. भडगाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) यांच्यासह संबंधित विश्वस्त, व्यापारी, कंत्राटदार आणि मध्यस्थांविरोधात भुदरगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर रागिणी खडके या फरार झाल्याची माहिती समोर आली आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा तपास आता आर्थिक गुन्हे शाखेकडे (एजथ) सोपविण्यात आला असून, कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारांची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. तपासातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, या प्रकरणात तत्कालीन सहायक धर्मादाय आयुक्त निवेदिता पवार यांच्यावरही गंभीर आरोप करण्यात आले असून, या कथित गैरव्यवहारामागे त्यांचाही सहभाग असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. (पान ४ वर)

## फसवणूक प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे बाळासाहेब नाहाटा यांना अटक



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रोजेक्ट (मॅझेट) नावाची महाराष्ट्र शासनाची कंपनी असून या कंपनीत पैसे गुंतवल्यास ७८ दिवसांत दामदुप्पट रक्कम होईल, असे आमिष दाखवून ९ कोटी ५० लाखांची फसवणूक केल्या प्रकरणी राज्य बाजार समितीचे सभापती प्रवीणकुमार तथा बाळासाहेब नाहाटा यांना श्रीगोंद्या पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना पुणे आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. नाहाटा यांना अटक झाल्याचे समजताच राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी राहुल रामराजे मक्तेदार यांनी २३ एप्रिल २०२५ रोजी डेक्कन (पुणे) पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदवली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की अजय श्यामकांत चौधरी व प्रवीणकुमार नाहाटा यांनी दि. १ डिसेंबर २०२३ ते २०२४ या कालावधीत ७८ दिवसांत दामदुप्पट रक्कम देण्याचे व कंपनीचे संचालक होण्याचे आमिष दाखविले. मोहापोटी आम्ही २ कोटी ६० लाखांची रक्कम प्रवीणकुमार नाहाटा व अजय चौधरी यांना दिली.

या प्रकरणात अजय चौधरी याने माझी नाहाटा यांच्याशी ओळख करून दिली आणि चौधरीच्या सांगण्यावरून नाहाटा यांच्या बँक खात्यावर एक कोटी, तर अजय चौधरी यांच्या बँक खात्यावर एक कोटी ६० लाख रुपये जमा केले. यामध्ये काही रक्कम रोख आहे. त्यावर राहुल मुक्तेदार यांचे फिर्यादीवरून पुणे पोलिसांनी अजय चौधरी याला पूर्वीच अटक केली आहे. झालेल्या करारानुसार अजय चौधरी व प्रवीणकुमार नाहाटा यांच्या विरोधात ९ कोटी ६० लाख रुपयांच्या फसवणुकीचा दावा पुणे जिल्हा सत्र न्यायालयात दाखल झाला आहे. मात्र नाहाटा पसार असल्याचे सांगण्यात येत होते. मात्र राजकीय नेता असल्याने पोलिस नाहाटा यांना अटक करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप केला जात होता.

दरम्यान, लोणीव्यंकनाथ प्रकरणाबाबत झालेल्या आंदोलनावरून बाळासाहेब नाहाटा यांनी (पान ४ वर)

## देशातील प्रत्येक रस्त्यावर चालण्यासाठी जागा असावी

### सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशातील प्रत्येक रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी स्पष्टपणे चिन्हांकित केलेली आणि कोणत्याही अतिक्रमणाशिवाय मोकळी जागा उपलब्ध करून दिली जाईल, याची खात्री केंद्राने करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला हे आदेश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २ आठवड्यानंतर ठेवली आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, यासाठी मोठ्या गुंतवणुकीची किंवा बांधकामाची गरज नाही. केवळ दोरी, कोणत्याही साध्या साधनांच्या साहाय्याने पादचाऱ्यांसाठीची जागा स्पष्टपणे आखून द्या. जिथे जिथे रस्ता आहे, तिथे चालण्यासाठी स्वतंत्र जागा असलीच पाहिजे आणि त्यावर अतिक्रमण होणार नाही, याची काळजी घ्या. पादचाऱ्यांना ही जागा आपल्यासाठीच आहे आणि वाहनांच्या धडकेचा कोणताही धोका न होता आपण तिथून सुरक्षितपणे चालू शकतो, असा विश्वास निर्माण झाला पाहिजे, यावर न्यायालयाने भर दिला.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
दैनिक युवावार्ता कार्यालय
निवेदन
दिनांक १ ऑगस्ट २०२६ पासून
दैनिक युवावार्ता जाहिरात दरात बदल
खालीलप्रमाणे करण्यात आले असून
जाहिरातदार व जाहिरात प्रतिनिधींनी नोंद घ्यावी.
छोटी जाहिरात साईज - ४x५ से. मी.
५ दिवसांसाठी -५०० रू. , १० दिवसांसाठी - ८०० रू.
नावात बदल जाहिरात
साईज ४X५ से. मी. - २०० रू.
वारस नोटीस , जन्म - मृत्यू जाहिरनामा
साईज - ८X६ से. मी. - ७०० रू.
जाहिरातीसाठी संपर्क - ८२७५४००८१७
E-mail- dailyyuvavarta@gmail.com

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# लाल परिची आषाढी भरारी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला यात्रेसाठी चालवण्यात आलेल्या विशेष ३८ बससेवेच्या माध्यमातून संगमनेर एसटी आगाराने दहा दिवसांच्या कालावधीत १० हजार भाविकांना दर्शन घडवत सुमारे २५ लाख ५० हजार रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. या निमित्ताने भक्तांबरोबरच संगमनेर एसटी आगारालाही पांडुरंग पावला आहे. आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठलाच्या चरणावर माथा ठेवण्याची परंपरा आहे. अनेक गावांमधून निघणाऱ्या पायी दिंड्या मजल दरमजल करीत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरला दाखल होतात. मात्र पायी जाण्यासाठी असमर्थ असलेले तरीही पांडुरंगाच्या दर्शनाची आस लागलेल्या भक्तांच्या सोयीसाठी विविध आगारांमधून खास यात्रेनिमित्त एसटी बसेसची व्यवस्था करण्यात येते. आषाढी यात्रेदरम्यान श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची गर्दी लक्षात घेऊन संगमनेर आगारातून एसटी बसचे नियोजन करण्यात आले होते. या ताफ्यात 'राजमाता जिजाऊ' आणि 'लालपरी' या बसेसचा समावेश होता. १० दिवसांच्या कालावधीत या बसेसनी ३८ हजार ५०० किलोमीटरचे अंतर कापून एकूण १३६ फेऱ्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या. भाविकांनी या नियोजनाबद्दल आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या तत्पर सेवेबद्दल समाधान व्यक्त केले आहे. आगार प्रमुख निलेश बेंडकुळे यांनी सांगितले की, अतिरिक्त बसेस वेळेत उपलब्ध झाल्यामुळे आणि चालक, वाहकांसह सर्व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम केल्यामुळेच हे यश शक्य झाले. भविष्यातही संगमनेर आगारातर्फे प्रवाशांना अशीच विश्वासार्ह सेवा देण्यासाठी प्रशासन सदैव कटिबद्ध राहील.

# किसान मोर्चाचे सोमवारी आंदोलन

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

संयुक्त किसान मोर्चाने दहा ऑगस्टपासून विविध टप्प्यांत देशभर आंदोलन करण्याची घोषणा केली असून या आंदोलनाचा समारोप २६ नोव्हेंबरला राजधानी दिल्लीत शेतकरी मोर्चाने होणार आहे. सात मुख्य मागण्यांसाठी हे आंदोलन होणार असून समारोपाच्या दिवशी देशभरातील १०० ठिकाणी मोर्चे काढले जाणार आहेत.

आंदोलनाची सुरुवात देशभरातील एक हजारहून अधिक ठिकाणांवर 'जेल भरो', 'रेल रोको' आणि रास्ता रोको' आंदोलनांनी होणार आहे. मागण्या मंजूर होईपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचे संयुक्त किसान मोर्चाच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

किमान आधारभूत किंमतीची हमी देणारा कायदा, सर्व पिकांची निश्चितपणे खरेदी, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, कामगार कायदे रद्द, मनरेगा योजना पुन्हा सुरू करावी या संयुक्त किसान मोर्चाच्या प्रमुख मागण्या आहेत. अन्नसुरक्षा कायद्यात बदल, जमीन हक्कांना संरक्षण, वीजमंडळांचे खासगीकरणाला विरोध अशाही मागण्या आहेत.

# डॉ. मीरा ढास यांनी स्वीकारला शिर्डी माहिती अधिकारी पदाचा कार्यभार

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिपत्याखालील उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे प्रशासकीय बदलीने नियुक्त झालेल्या डॉ. मीरा ढास यांनी आज माहिती अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.



डॉ. ढास या जुलै २००८ मध्ये शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागात उपसंपादक म्हणून मंत्रालय, मुंबई येथे रुजू झाल्या. त्यानंतर त्यांनी जिल्हा माहिती कार्यालय, पुणे तसेच विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे सहाय्यक संचालक म्हणून कार्य केले. पुढे जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यानंतर त्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. तेथून प्रशासकीय बदलीने त्यांची उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी आज पदाचा कार्यभार स्वीकारला.

पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. मीरा ढास यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोरक्ष गाडीलकर यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री. गोरक्ष गाडीलकर यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. मीरा ढास यांनी सांगितले की प्रभावी संवाद कौशल्याच्या आणि विविध समाज माध्यमातून शासनाच्या जन कल्याणकारी योजना व विविध उपक्रमांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. शिर्डी हे ठिकाण श्री साईबाबा यांच्या पावन भूमीमुळे प्रसिद्ध आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक आणि पर्यटक दर्शनासाठी येत असतात.

# "पैसे संपले... पण श्वास थांबला नव्हता!"

## गरिबी, आरोग्य व्यवस्था आणि कुटुंबाची ओढाताण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात घडल्याचे सांगितल्या जाणाऱ्या एका कथित घटनेने आरोग्य व्यवस्था, गरिबी आणि माणुसकी यांबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, तालुक्यातील एका मोठ्या गावातील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या गरीब कुटुंबातील व्यक्तीला शहरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्ण अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर उपचार घेत होता. मात्र, दररोज होणारा मोठा खर्च त्या कुटुंबाला परवडणारा नव्हता.

रुग्णाच्या मुलाने डॉक्टरांना वडिलांच्या प्रकृतीबाबत विचारणा केली असता, पुढील २४ तास निरीक्षणाखाली ठेवावे लागेल, मात्र रुग्ण निश्चित बरा होईल याची हमी देता येणार नाही, असे सांगण्यात आल्याचा नातेवाईकांचा दावा आहे. आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने पुढील उपचारांचा खर्च उचलणे कुटुंबासाठी अशक्य झाले. यानंतर, नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, व्हेंटिलेटर काढल्यानंतर रुग्ण फार काळ जिवंत राहणार नाही, अशी माहिती देण्यात आली. मनावर दगड ठेवून कुटुंबीयांनी वडिलांना घरी नेण्याचा निर्णय घेतला. आवश्यक आर्थिक व्यवहार पूर्ण करून रुग्णाला म्ब्युलन्समधून गावाकडे रवाना करण्यात आले.

परंतु, गावात पोहोचताच अनपेक्षित घडले. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, रुग्णामध्ये हालचाल जाणवू लागली आणि तो जिवंत असल्याचे लक्षात आले. घाबरलेल्या कुटुंबीयांनी तातडीने दुसऱ्या रुग्णालयात दाखल केले. सध्या रुग्णाची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले जात आहे. वरील घटनेतून केवळ वैद्यकीय व्यवस्थेवरील प्रश्न उपस्थित करत नाही, तर गरिबी माणसाला किती हतबल करू शकते याचेही अत्यंत वेदनादायी उदाहरण ठरते. एका मुलाला आपल्या वडिलांच्या जीवापेक्षा उपचारांचा खर्च मोठा वाटत नव्हता; पण पैशांच्या कमतरतेमुळे त्याच्यासमोर दुसरा पर्याय उरला नव्हता. हा निर्णय त्याने हृदयावर दगड ठेवून घेतला होता. आरोग्य सेवा ही पैशांपेक्षा माणुसकीवर उभी असावी, अशी समाजाची अपेक्षा आहे. गरीब रुग्णांनाही सन्मानाने आणि पारदर्शक पद्धतीने उपचार मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे आणि जर कोणाची निष्काळजीपणा अथवा चूक आढळली, तर संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

गरिबी माणसाला अनेक निर्णय घ्यायला भाग पाडते; पण पैशाअभावी एखाद्या मुलाला आपल्या वडिलांचा शेवटचा निरोप घ्यायची तयारी करावी लागणे, ही कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी वेदनादायी बाब आहे. माणुसकी जिवंत ठेवायची असेल, तर आरोग्य व्यवस्था अधिक संवेदनशील आणि उत्तरदायी व्हावी लागेल.


SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

# ईडी, सीबीआय तुमच्याकडे मग जेन झी ची धास्ती का - दिपके

मुंबई (वृत्तसंस्था)

सीजेपी पक्षाचे संस्थापक आणि विद्यार्थी आंदोलनाचा चेहरा बनलेले अभिजीत दिपके यांनी सध्याच्या राजकीय घडामोडींवर आणि त्यांच्यावर होत असलेल्या आरोपांवर सविस्तर भाष्य केले आहे. शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांच्यासोबत झालेल्या भेटीवरून निर्माण झालेल्या राजकीय चर्चांवर त्यांनी मोठा खुलासा केला आहे. तसेच, भाजपने एका ३० वर्षांच्या मुलाची एवढी भीती बाळगण्याची गरज नाही, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

संजय शिरसाट यांच्यासोबत झालेल्या भेटीबाबत बोलताना अभिजीत दिपके म्हणाले, एका ३० वर्षांच्या मुलापासून तुम्हाला एवढी भीती वाटते, यावर मी काय बोलू? संजय शिरसाट हे मला फक्त वैयक्तिक पातळीवर



भेटायला आले होते आणि शुभेच्छा देण्यासाठी आले होते. यापलीकडे दुसरे काहीही नाही. आमचे कोणतेही राजकीय बोलणे झाले नाही. 'तुम्ही युवकांचा आणि देशाचा चांगला मुद्दा उचलला', असे म्हणून त्यांनी मला शुभेच्छा दिल्या. याच मुद्द्यावरून भाजपला लक्ष करत दिपके म्हणाले, मी भाजपाला सांगू इच्छितो की, एवढी घाबरण्याची गरज नाही. ईडी, सीबीआय सगळं काही तुमच्याकडेच आहे, आमच्याकडे काहीच नाही.

# अकोले तालुक्यातील युवकांचे आशास्थान

## विक्रमभाऊ नवले यांना वाढिदवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

अकोले तालुक्यातील युवा नेते, भारतीय किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, अभिनव शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष, बुवासाहेब नवले मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन मा. विक्रम मधुकर नवले यांचा आज वाढदिवस. वाढदिवसाच्या विक्रम भाऊंना मन:पूर्वक शुभेच्छा.



अकोले तालुक्यातील सुपरिचित व सर्वांचे आवडते ज्येष्ठ राजकीय नेते मा. मधुकरराव नवले व सुमनताई नवले यांचे सुपुत्र. मा. मधुकरराव नवले, जे सर्वांना भाऊ म्हणून परिचित आहेत. एक सदाचार संपन्न, सद्विवेकी, समाजाभिमुख, आर्थिक, सामाजिक, राजकीय शैक्षणिक या सर्व बाबींचे वैचारिक विद्यापीठच जणू! अशा कुटुंबात मा. विक्रमभाऊ नवले यांचा जन्म झाला. लहान बाळाने आपल्या सभोवताली असलेल्या भल्या मोठ्या परिसराचे हळूहळू अवलोकन करावे व विचारपूर्वक पुढे पाऊल टाकावे तसेच काहीसे विक्रम भाऊंच्या बाबतीत झाले. लहानपणापासूनच मा. मधुभाऊंचा आदर्श, आचार, विचार, शिस्त यामध्ये विक्रमभाऊ लहानचे मोठे झाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. त्यांचा वैचारिक ठेवा तयार झाला. आपल्या वडिलांच्या प्रति अपार प्रेम, आदर, स्नेह, श्रद्धा, विश्वास. त्यांच्यापुढे एक शब्दही विक्रम भाऊंच्या तोंडातून फुटणार नाही इतकी आदरयुक्त भीती. मा. मधुभाऊंच्या वटवृक्षाच्या सावलीत, सतत माणसांचा राबता असलेल्या कुटुंबात स्वतः सामावून घेणं, मा. भाऊंच्या कर्तृत्वाचा वसा पुढे घेऊन चालणं हे इतकं सोपं नाही. असे म्हणतात की बहरलेल्या, फुललेल्या मोठ्या झाडाच्या सावलीत छोटी झुडपे वाढत नाहीत. परंतु विक्रम भाऊंनी मात्र मा. भाऊंच्या बहरलेल्या फुललेल्या वटवृक्षाच्या सावलीतही स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न केला व करत आहेत. एक उदयोन्मुख युवा नेता म्हणून स्वतःला समाजासमोर त्यांनी प्रस्थापित केले आहे. आजच्या सैरभैर झालेल्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत संभ्रमावस्थेत असलेल्या युवक वर्गासमोर तालुक्यातील युवकांसाठी विक्रमभाऊ एक आशास्थान आहे. तालुक्यातील युवावर्गाचे महत्त्वाचे प्रश्न हाताळणारा, त्यांना मदतीचा हात देणारा, त्यांना मार्गदर्शन करणारा एक आशेचा किरण म्हणून विक्रम भाऊ यांच्याकडे पाहिले जाते. आदरणीय मधुभाऊंच्या मार्गदर्शनाखाली बुवासाहेब नवले मल्टीस्टेट बँकेचे कामकाज विक्रम भाऊ चेअरमन म्हणून सक्षमपणे सांभाळत आहेत. अभिनव शिक्षण संस्थेचे खजिनदार म्हणूनही अनेक अडचणींतून मार्ग काढत ते मार्गक्रमण करत आहेत. भारतीय किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणूनही ते काम पाहत आहेत. त्यांच्याकडे असलेली दूरदृष्टी, समाजाभिमुखता, संघटन कौशल्य, सेवाभाव, काम करण्याची जिद्द व धडाडी त्यांना स्वस्त बसू देत नाही. त्यांच्या पुढील वाटचालीत अनेक समाजाभिमुख प्रोजेक्टस् प्रस्तावित आहेत. या सर्व प्रोजेक्ट्सवर त्यांचे काम सध्या सुरू आहे. त्यांच्या या विक्रम पर्वाच्या आरंभास, वाटचालीस व वाढदिवसाच्या त्यांना कोटी कोटी शुभेच्छा....

**ईश्वर त्वां च सदा रक्षदु,**
**पुण्यकर्मणा कीर्तिमार्जय.**
**जीवनंम तव भवतु सार्थकं**
**इति सर्वदा मुदम प्रार्थयामहे**
**जन्मदिवसस्य कोटिशः**
**शुभकामना!**

**शब्दांकन -**
**डॉ. जयश्री देशमुख**
**कॅम्पस डायरेक्टर**
**अभिनव शिक्षण संस्था, अकोले**

# संघर्षातून यशाच्या शिखरावर पोहोचलेले राजापूरचे सुपुत्र

## संभाजी माधव हासे यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

माणसाच्या आयुष्यात यश हे सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी संघर्षाची वाट चालावी लागते, संकटांशी दोन हात करावे लागतात आणि प्रत्येक अडचणीवर मात करत स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करावे लागते. अशाच संघर्षातून यशाचे शिखर गाठत आपल्या कर्तृत्वाने आणि माणुसकीने समाजात वेगळी ओळख निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे राजापूरचे सुपुत्र, यशस्वी उद्योजक आणि समाजसेवक श्री. संभाजीराव हासे.

राजापूरच्या साध्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्याकाळी घरची परिस्थिती अत्यंत नाजूक होती. अनेक आर्थिक अडचणी, मर्यादा आणि संघर्ष असूनही त्यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही. शिक्षण हेच आयुष्य बदलण्याचे सामर्थ्य आहे, या विश्वासातून त्यांनी जिद्दीने आपले पदवी शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या आयुष्यातील हा टप्पा अनेक युवकांसाठी प्रेरणादायी आहे, कारण संकटे कितीही मोठी असली तरी इच्छाशक्ती मोठी असेल तर यश निश्चित मिळते, हे त्यांनी कृतीतून सिद्ध करून दाखवले.

शिक्षणानंतर त्यांनी उद्योजकतेचा मार्ग स्वीकारला आणि गगन डेव्हलपर्स रिअल इस्टेटच्या माध्यमातून आपल्या व्यवसायाची यशस्वी सुरुवात केली. प्रामाणिक व्यवहार, विश्वासार्हता आणि गुणवत्तेच्या जोरावर त्यांनी या क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कामाची पद्धत, लोकांशी असलेला स्नेह आणि दिलेला शब्द पाळण्याची वृत्ती यामुळे त्यांना समाजात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. परंतु संभाजीराव हासे यांचे व्यक्तिमत्त्व केवळ यशस्वी उद्योजक म्हणून मर्यादित नाही. व्यवसाय करत असतानाच त्यांनी समाजसेवेची कास कधीही सोडली नाही. अनेक गरजू, गोरगरीब आणि सर्वसामान्य कुटुंबांना त्यांनी विविध प्रकारची मदत केली. अनेकांची कामे स्वतःची समजून पूर्ण केली, अनेकांना आधार दिला आणि संकटाच्या प्रसंगी मदतीचा हात पुढे केला. त्यामुळेच त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात जिव्हाळा, विश्वास आणि आत्मीयता आहे.

राजापूर गावात ते एक सक्रिय सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. गावातील यात्रा उत्सव,



धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक सोहळे आणि लोकहिताच्या विविध कामांमध्ये त्यांचा नेहमीच उत्स्फूर्त सहभाग असतो. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन विकासाची वाट चालण्याचा त्यांचा दृष्टिकोन अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. गावाच्या प्रगतीसाठी आणि सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान निश्चितच मोलाचे आहे.

संभाजीराव हासे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात मोठा पैलू म्हणजे त्यांचा मनमिळावू आणि दिलदार स्वभाव. मित्रांच्या सुख-दुःखात सदैव खंबीरपणे उभे राहणारे, प्रत्येकाशी आपुलकीने वागणारे आणि नाती जपणारे म्हणून त्यांची ओळख आहे. म्हणूनच मित्रपरिवारात त्यांना प्रेमाने मैत्रीच्या दुनियेतील राजा माणूस असे संबोधले जाते. त्यांच्या सहवासात आलेला प्रत्येकजण त्यांच्यातील माणुसकीचा अनुभव घेतो. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या संघर्षमय प्रवासाला, उद्योजकीय यशाला आणि समाजसेवेच्या कार्याला मनःपूर्वक सलाम! त्यांनी अशीच यशाची नवनवी शिखरे सर करावीत, उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड आनंद आणि समाजसेवेची प्रेरणा त्यांना लाभत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. संघर्षातून उभा राहिलेला हा प्रवास असंख्य तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. यश, कर्तृत्व, मैत्री आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम असलेले श्री. संभाजीराव हासे यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! त्यांच्या जीवनात सुख, समृद्धी, कीर्ती आणि सेवाभावाचा हा प्रवास दिवसेंदिवस अधिक उज्ज्वल होत राहो, हीच सदिच्छा!

**सुहास सातपुते**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता, संगमनेर**

# संघर्ष घंटागाडी कामगार संघटना संप मिटला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरातील घंटागाडी कामगारांच्या अनेक समस्या आहेत. शहरातील संपूर्ण घान, सडलेले अन्न,मेलेले कुत्रे, मांजर इत्यादी सर्व गोळा करून उचलण्याचे काम ते करतात. घनकचरा व्यवस्थापनासाठी संगमनेर नगरपालिका निविदा मागवून कंपन्यांना ठेका देत असते. परंतु हा ठेका देतांना घंटागाडी कामगारांची बाजू ऐकून घेतली जात नाही. तसेच गेल्या सात वर्षांपूर्वी तीन वर्षे कालावधीसाठी ठेका देण्यात आला. त्यानंतर चार वर्षे कालावधीत वेळोवेळी ठेकेदारास मुदत वाढ देण्यात आली परंतु कामगारांना मात्र मजुरीची रक्कम वाढविण्यात आली नाही. सात वर्षांपूर्वी मोबदला मिळत होता तोच मोबदला आजही देण्यात येतो.

त्यामुळे या प्रमुख दोन मागण्यासाठी संघर्ष घंटागाडी कामगार संघटनेमार्फत ३१ जुलै २०२६ पासून आंदोलन सुरू केले. शेवटी आज संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री गोऱ्हे साहेब, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, नगरसेवक श्री किशोर टोकसे, नगरसेवक श्री गणेश गुंजाळ आणि संघर्ष घंटागाडी कामगार संघटनेतर्फे संस्थापक अँड.संग्राम माधवराव जोंधळे, अध्यक्ष सावळेराम चंदर शिंदे, उपाध्यक्ष अक्षय शिंदे व वसीम शेख, सचिव इम्रान शेख, खजिनदार दीपक अंकुशे, तसेच शरद पवार राकेश रहाणे, योगेश बटवाल, बबन गाडेकर व इतर कामगारांनी सहभाग घेतला. सुमारे तीन तास चर्चा होऊन त्यामध्ये असे ठरले की, यापूर्वीच्या ठेक्याची मुदत संपत आलेली असून सोमवार दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी नवीन टेंडर ची जाहिरात वर्तमानपत्रांमध्ये देण्यात येईल. नवीन ठेकेदाराचा करारनामा करताना कामगार संघटनेला आमंत्रित करून कामगारांच्या काय मागण्या, सूचना आहेत याचा योग्य तो अंतर्भाव केला जाईल.

दुसरी मागणी की कामगारांना मार्च २०२६ पासून वाढीव वेतन नवीन ठेक्याच्या मजुरीच्या रकमेप्रमाणे देण्यात येईल. त्यामुळे घंटागाडी कामगारांनी सुरू केलेल्या बेमुदत संप संगमनेरातील नागरिकांचा विचार करून थांबविण्यात आलेला आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# माजी मंत्री थोरात यांच्या सहकार्यातून चिखलमय रस्त्यांवर मुरुम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - काटेरी झुडपे आणि वारंवार होणारा चिखल असे चित्र सध्या या रस्त्यावर दिसत आहे. यामुळे विद्यार्थी शेतकरी नागरिकांची गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांनाही चिखल तुडवत शाळेची वाट पार करावी लागते.

गावाला जोडणाऱ्या सर्वच रस्त्याची सध्या दुरवस्था झाल्यामुळे मरून टाकण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत होती. परंतु प्रशासक असल्यामुळे निधी उपलब्ध होण्यासाठी अडचणी येत होत्या. शेतकऱ्यांच्या अडचणीची दखल घेत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तातडीने मुरूम उपलब्ध करून दिला.राजहंस दूध संघा मार्फत जेसीबी,ट्रॅक्टरच्या सहाय्याने हिवरगाव पावसा येथील चिखलम रस्त्यावर मुरूम टाकण्यात येत आहे. त्यामुळे गावातील शेतकरी नागरिक विद्यार्थी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

ठिकठिकाणी पडलेले खड्डे सध्या पावसामुळे चिखलमय झाले आहेत.याच चिखलातून सध्या धोकादायक पद्धतीने शेतकरी व नागरिकांना वाट काढवी लागत आहे. या रस्त्यालगत असलेल्या विद्यार्थ्यांना चिखलमय रस्त्यावरून शाळेला यावे लागते. अमरधाम जवळील ओढ्यातील रस्ता आणि गावातील इतर असते धोकादायक बनल्याचे फोटो समाज माध्यमातून वायरल झाले.त्याची तातडीने दखल माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी चिखलमय रस्त्यांना मुरूम उपलब्ध करून दिला.जेसीबी ट्रॅक्टरच्या सहाय्याने हिवरगाव पावसा गावातील चिखलमय रस्त्यांना मुरूम टाकणे कमी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील काँग्रेस कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.तसेच मुसळधार पाऊस आणि प्रवरा नदीला पूर आल्याने पाणीपुरवठा आठ दिवसांपासून गावातील विस्कळीत झाला होता.त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. या वेळी राजहंस दूध संघाचे संचालक यांनी चेअरमन रणजीत देशमुख यांच्या कडे पाठपुरावा केला असता त्यांच्या सहकार्यातून गावातील नागरिकांना राजहंस दूध संघा मार्फत पिण्याचा पाण्याचा टॅकर उपलब्ध करून देण्यात आला.

# जातीवाचक शिवीगाळ प्रकरणात जामीन फेटाळला

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी पोलीस ठाण्यात अनुसूचित जमातीच्या व्यक्तीला जातीवाचक शिवीगाळ, मारहाण, जीवे मारण्याची धमकी देत मोटारसायकल बळजबरीने हिसकावून घेतल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील आरोपी फिरोज नबाब शेख व अन्वर नबाब शेख यांचा अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश मंदार नेरलेकर यांनी १ ऑगस्ट २०२६ रोजी हा आदेश दिला. फिर्यादी सुनिल बाबासाहेब बर्डे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १० जुलै २०२६ रोजी निमगावजाळी येथील गोविंदा गार्डन हॉटेलजवळ आरोपींनी त्यांना अडवून आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून वाद घातला. त्यानंतर जातीवाचक शिवीगाळ, मारहाण, गुप्तांगावर लाथ मारून दुखापत, जीवे मारण्याची धमकी तसेच एमएच-१७-डीपी-८८०२ क्रमांकाची मोटारसायकल बळजबरीने हिसकावून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे.

फिर्यादी उपचारासाठी रुग्णालयात असल्याने १५ जुलै रोजी आश्वी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झाली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता (इछड) तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत गुन्हा क्रमांक १५०/२०२६ नोंद करण्यात आला. अटकपूर्व जामीन अर्जात आरोपींनी आपण निष्पाप असून घटनेच्या वेळी घटनास्थळी नसल्याचा दावा केला. आर्थिक व्यवहारातून दबाव आणण्यासाठी खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगत फिर्याद दाखल होण्यास झालेला विलंब संशयास्पद असल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाचे वकील ॲड. गणपुले यांनी केला. सरकारी वकील श्री. वाकचौरे यांनी फिर्यादी अनुसूचित जमातीचा असल्याची माहिती असूनही आरोपींनी सार्वजनिक ठिकाणी जातीवाचक शिवीगाळ, मारहाण व धमकी दिल्याचा गंभीर आरोप असल्याचे न्यायालयास सांगितले. तपास सुरू असल्याने अटकपूर्व जामीन दिल्यास साक्षीदारांवर दबाव आणण्याची व पुराव्याशी छेडछाड होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले. मूळ फिर्यादीतर्फे ड. सोनाली बोटवे यांनी फिर्यादी उपचाराधीन असल्यामुळे फिर्याद उशिरा दाखल झाल्याचे समाधानकारक स्पष्टीकरण दिले. तसेच आरोपींनी पूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यांचा जामीन अर्जातील अनिवार्य जोडपत्रात उल्लेख केला नसल्याचे आणि सादर केलेल्या सीसीटीव्ही फुटेजबाबत शंका उपस्थित केली. तपासाच्या प्राथमिक टप्प्यावर आरोपींना अटकपूर्व जामीन देणे योग्य ठरणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

# क्युसीआय मूल्यांकनात डॉ. इथापे इन्स्टियूट ऑफ फार्मसीचे उल्लेखनीय यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - इन्स्टिटट्यूट संचूलित डॉ. इथापे इन्स्टिटट्यूट ऑफ फार्मसी (वेल्हाळे संगमनेर) या संस्थेने फार्मसी शिक्षण क्षेत्रान ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. कम क्वालिट्टी कौन्सिल ऑफ इंडिया टउख) च्या मूल्याकनात संस्थेच्या डिप्लोमा इन फार्मसी अभ्यासक्रमाला 'ए' ग्रेड मानांकन मिळाले असून, संस्थेने देशात २६ वा. व महाराष्ट्रान ९. वा क्रमांक पटकावला आहे.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या सहकार्याने या प्रक्रियेत देशभरातील १५९ डी. फार्मसी संस्था सहभागी झाल्या होत्या. शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा, प्रभावी अध्यापन आणि प्लेसमेंट अशा विविध निकषांवर डॉ. इथापे इन्स्टिटयूटने आफ सर्वोच्च गुण मिळवले. या यशाबददल डॉ. इथाचे संगमनेर मेडिकल फाउंडेशन रिसर्च इन्स्टिटट्यूटचे अध्यक्ष डॉ. अशोकराव इथापे, इन्स्टियूटचे प्राचार्य डॉ. महेंद्र गिरी. उपप्राचार्य डॉ. अविनाश मनसुक यांच्यासह सर्व प्राध्यापक कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

# निलेश आहेर यांच्या वाढदिवसानिमित्त सिताई महाविद्यालयात वृक्षारोपण



युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - सिताई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, घारगाव येथे महाविद्यालयाचे व्यवस्थापक मा. निलेश अशोक आहेर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वाढदिवसानिमित्त होणाऱ्या अनावश्यक बॅनरबाजी व इतर खर्चाला फाटा देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी महाविद्यालय परिसरात आंबा, आवळा, बेल आदी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमात मा. निलेश आहेर यांनी विद्यार्थी व प्राध्यापकांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देत प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी आपला वाढदिवस महाविद्यालयासह प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत उत्साहात साजरा केला.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सीईओ प्रा. मंगेश विलास वाघमारे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# आयुष्यभर आई शोधण्याची लढाई करणारे महाकवी नारायण सुर्वे...

संगमनेर साहित्य, कला व सांस्कृतिक संघाच्या वतीने कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित एकदिवसीय साहित्य जत्रा संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या भाषणाचा सारांश..



जगण्यात आणि लिहिण्यातलं अंतर पुसून टाकून बोलणारा आणि लिहिणारा असं साहित्यिक मानलं जातं त्या कविवर्य नारायण सुर्वे यांची जन्मशताब्दी सध्या सुरू आहे. परंतु दुर्दैव असं आहे की, सरकार दप्तरी त्याची नोंद नाही. ते का नाही, कारण सुर्वे असा महान क्रांतिकारी कवी आहे, की तो आत्ताच्या महाराष्ट्र शासनाला पचणारच नाही. त्यामुळे सरकार काय करतं जे पचत नाही, ते सोडून देतं आणि संगमनेर काय करतं, जे सरकार सोडून देतं ते आपल्या काळजावर नोंदवते. या संमेलनाच्या निमित्ताने संगमनेरकरांनी ते करून दाखवलं आहे. त्यामुळे सरकारने आता काहीही केलं तरी त्याला किंमत शून्य आहे.

एका अर्थाने बरे झाले शासनाला सुर्वेंची आठवण झाली नाही. कारण सुर्वे हे असे महाकवी होते ते व्यवस्थेतल्या कोणत्याही चौकटीत, कोणत्याही पुरस्कारात कधीही मावले नाहीत आणि शासनाच्या तर ते मावणारच नव्हते. महाराष्ट्रातील कोणतीही समीक्षा सुर्वेंना पकडू शकली नाही, म्हणून प्रत्येकासमोर प्रत्येक वेळी एकच प्रश्न पडायचा की सुर्वेंची गणती कोणत्या समीक्षेच्या चौकटीत करायची. लोक पीएचडी, समीक्षाग्रंथ लिहून थकले. त्यांच्या कवितेवर अनेक प्रयोग करून थकले, त्यांच्या कविता ऐकून थकले पण सुर्वे नेहमी आऊट ऑफ बॉक्स. सुर्वेंच्या जन्मशताब्दी निमित्ताने आजचे हे साहित्य जत्रा संमेलन म्हणजे एक वेगळी विलक्षण वाटावी अशी गोष्ट आहे. कारण जत्रा ही आपल्या सांस्कृतिक जीवनाची परंपरा आहे. त्या परंपरेचे नाव या संमेलनाला दिले ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे..

गेल्या काही वर्षात पुरोगामी, क्रांतिकारी, परिवर्तनवादी, विचारवादी असे खूप कवी, साहित्यिक इथल्या व्यवस्थेने अडगळीत टाकलेले आहेत. असं समजू नका की डार्विनलाच फक्त अडगळीत टाकले आहे. डार्विन गेला, मनू आला. टेस्ट ट्यूब बेबी गेली, यज्ञ आला.

महाराष्ट्रातलं जे साहित्यिक क्षेत्र आहे ते बहुजनांचे कधीच नव्हतं, ते अभिजनांचं होतं. बहुजन खूप उशिरा आले या साहित्य क्षेत्रात. कारण आपल्याकडे साहित्य कोणी लिहावं, कधी लिहावं याचेच नियम होते. हे नियम जर आज लागू असते तर आपण कुठेच नसतो. परंतु बहुजनाने हे नियम मोडले, या परंपरा, ही व्यवस्था मोडली म्हणून हे संमेलन आपलं आहे.

सांगण्यासाठी ज्यांना परंपराच नव्हती, इतिहास नव्हता, छोटी मोठी जात नव्हती, ज्यांना जगाच्या भूगोलामध्ये एका बिंदू एवढे देखील स्थान नव्हतं. आपण कुणाच्या गर्भाशयात वाढलो हे सांगण्यासाठी कोणाच्या आईचं नाव ओठावर नव्हतं. गर्भ कुणामुळे वाढला हे सांगण्यासाठी बापाचं नाव नव्हतं 'गर्व से कहो हम हिंदू है' म्हणण्यासाठी कोणताही धर्म नव्हता, ना गाव होतं, ना गावाची शिव होती, ना शेजार होता. अशा परिस्थितीत मुंबईच्या फुटपाथवर सापडलेल्या एका मांसाच्या गोळ्याचं नाव म्हणजे नारायण सुर्वे. म्हणून सुर्वेच्या नावाने संमेलन भरवणे ही आनंदाची गोष्ट आहे, तशी ती एक जोखीम सुद्धा आहे. कोणालाच वाटलं नव्हतं, फुटपाथवर सापडलेला एक मांसाचा गोळा पद्मश्री स्वीकारायला एक दिवस दिल्लीला जाईल आणि राष्ट्रीय ध्वजात लपेटून त्याचा देह अंत्यसंस्काराला नेला जाईल. कुणालाच वाटलं नव्हतं हा मासाचा गोळा रशियामध्ये जाईल आणि रशिया मधल्या सगळ्या सरकारी रेडिओ स्टेशनवर त्याची मुलाखत होईल आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी ब्रावदा नावाच्या तेव्हाच्या रशियातील पेपरमध्ये न्यूज स्टोरी (अँकर स्टोरी) म्हणून नारायण सुर्वे असेल.

नारायण सुर्वेंनी लिहिलेलं 'डोंगरी शेत माझं ग' हे गीत नाशिक जिल्ह्यातल्या चांदवड मध्ये शरद जोशींच्या शेतकरी संघटनेतल्या दीड लाख महिला ज्या पाठीला, पोटाला पोर बांधून, भाकरीची खोर ठेवत उभ्या राहतात आणि एका सुरामध्ये डोंगरी शेत माझं ग हे गाणं गातात आणि जगाच्या कवितेमध्ये एक नवा विक्रम होतो. असा कवी ज्याची कविता, ज्याचं गाणं दीड लाख महिलांनी एकत्र येऊन जगाच्या पाठीवर कधीच म्हटलेलं नव्हतं ते नारायण सुर्वे. ज्यांनी शाळेची पायरी कधीच चढली नाही. आयुष्यभर वणवण भटकून सुद्धा जन्म देणारी आईच सापडली नाही. मुंबईच्या गिरणीमध्ये काम करणाऱ्या गंगाराम सुर्वेंनी त्या मासाच्या गोळ्याला उचलून आपल्या बायकोच्या हातात दिलं होतं. आयुष्यभर आई शोधण्याची लढाई ज्यांनी केली ते नारायण सुर्वे.

माझ्या आयुष्यामध्ये मला कुसुमाग्रज, बाबुराव बागुल आणि नारायण सुर्वे हे तीन बाप लाभले. ते बाप नसून प्रचंड मोठी वटवृक्षासारखी झाडं होती. आणि ह्या प्रत्येक झाडाने मला घरटं बांधायला जागा दिली. मी किती पान तोडली पण झाड नाही रागावले. मला घर बांधायला प्रोत्साहन देत होती. नारायण सुर्वेंनी मला नेहमी आधार दिला, विशाल वृक्षासारखी सावली दिली. परंतु त्यांच्या जाण्याने तो वृक्ष देखील आता कोसळून पडला आहे. तेव्हा मनात विचार यायचा की आता पक्षाने जावं तरी कुठे, आणि घरट बांधाव तरी कुठे. म्हणून जेव्हा सगळीच झाड कोसळतात तेव्हा पक्षाने आक्रोश न करता, स्वतः एक झाड व्हावं आणि आपल्या हलणाऱ्या, डुलणाऱ्या सगळ्या फांद्या अन्य पक्षांना घरटे बांधण्यासाठी मोकळ्या करून द्याव्यात. कारण वटवृक्ष होण्याची परंपरा मराठी साहित्याला या दिग्गजांनी दिली त्या परंपरेचा पाईक होण्याचे भाग्य मला लाभलं. सुर्वेंकडे आधार कार्ड, पॅन कार्ड नव्हतं. मी जन्माला आलो हे सांगण्यासाठी डॉक्युमेंट नव्हतं, ते सुर्वे पद्मश्री झाले आणि जगाचा निरोप घेताना तिरंग्यातून गेले. त्यांचा हा प्रवास, त्या सर्व आठवणी मी 'तिरंग्यातून गेला बाप' या पुस्तकातून मांडल्या आहेत.

सुर्वे यांना पद्मश्री मिळाल्यानंतर एकदा त्यांच्याशी गप्पा मारत असताना मी सहज विचारलं की, पद्मश्री मिळाल्यावर काय वाटतं? त्यावर सुर्वे हसले आणि त्यांनी जे उत्तर दिलं ते अतिशय मार्मिक आणि काळजाला भिडणारे होते. ते म्हणतात.. बरे झाले नारायणा, तुला पद्मश्री लाभले...

**शब्दांकन – विजय पाटील**
**मो. ९८२२०२०५०४**

**क्रमशः**

# जिजामाता स्कूलमध्ये किशोरवयीन आरोग्य शिक्षण व पोस्को जागरूकता सत्र उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

कैलासवासी शंकरराव शेवाळे पाटील प्रतिष्ठानच्या वतीने जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर येथे किशोरवयीन मुला-मुलींसाठी आरोग्य शिक्षण व इजउडज कायदा जागरूकता सत्र उत्साहपूर्ण व मार्गदर्शक वातावरणात संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच त्यांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्याबरोबरच वैयक्तिक सुरक्षिततेची जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

विद्यार्थ्यांना विषय मोकळेपणाने व प्रभावीपणे समजावा यासाठी मुला व मुलींसाठी स्वतंत्र सत्रांचे आयोजन करण्यात आले. मुलांसाठीचे सत्र संगमनेर येथील प्रख्यात जनरल सर्जन डॉ. किशोर गाढवे यांनी घेतले, तर मुलींसाठीचे सत्र नामांकित स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. विशाखा पाचोरे यांनी अत्यंत प्रभावीपणे मार्गदर्शन करून समृद्ध केले.

डॉ. किशोर गाढवे यांनी पौगंडावस्थेमध्ये होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक व हार्मोनल बदल यांचे सखोल विवेचन केले. त्यांनी वैयक्तिक स्वच्छता, संतुलित आहार, निरोगी जीवनशैली, व्यसनांपासून दूर राहण्याचे महत्त्व तसेच आत्मसंयम, आत्मविश्वास आणि जबाबदार वर्तन यावर विशेष भर दिला. याशिवाय महिलांचा सन्मान, शिस्तीचे पालन व सामाजिक मूल्यांची जपणूक याचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

डॉ. विशाखा पाचोरे यांनी किशोरवयीन मुलींमध्ये होणारे शारीरिक, मानसिक व भावनिक बदल अत्यंत सोप्या, वैज्ञानिक व समजण्यास सुलभ पद्धतीने स्पष्ट केले. मासिक पाळीतील स्वच्छता (Menstrual Hygiene), वैयक्तिक आरोग्याची काळजी, आत्मविश्वास वाढविणे व सकारात्मक दृष्टीकोन अंगीकारणे याविषयी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. वाढत्या वयातील बदल नैसर्गिक असून त्यांना सकारात्मकतेने स्वीकारणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या सत्रात Good Touch - Bad Touch, वैयक्तिक सुरक्षितता, स्वतःच्या मर्यादा ओळखणे व कोणत्याही अयोग्य स्पर्श किंवा वर्तनास ठाम नकार देणे याविषयी विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यात आली. तसेच POCSO (The Protection of Children from Sexual Offences) Act, २०१२ अंतर्गत मुलांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी, विद्यार्थ्यांचे हक्क व तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया यांचीही माहिती देण्यात आली.

सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारले व शंकांचे निरसन करून घेतले. तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मोकळेपणाने संवाद साधण्यास प्रोत्साहित केले. त्यांच्या प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता, वैयक्तिक सुरक्षिततेची जाणीव आणि सकारात्मक दृष्टिकोन अधिक दृढ झाला. या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन, सचिव, प्राचार्या व उपप्राचार्या यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. इयत्ता ६ वी ते १० वी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

कैलासवासी शंकरराव शेवाळे पाटील प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणारे असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास, आरोग्य व सुरक्षिततेसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून भविष्यातही अशा उपक्रमांची मालिका राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## संपादकीय...

# कीर्तनातून लोकजागृती

महाराष्ट्रात कीर्तनाची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे. येथे होणाऱ्या कीर्तनांत नारदीय कीर्तन आणि वारकरी कीर्तन असे दोन मुख्य प्रकार आहेत. नारद हा भारतातील आद्य कीर्तनकार आहे, असे मानले जाते. शब्द व्युत्पत्ती आणि व्याख्या आरंभ- कीर्तन हा शब्द संस्कृतात कत या दहाव्या गणातल्या धातूपासून झाला आहे. या धातूचा अर्थ उच्चारणे, सांगणे असा होतो. कीर्तन ज्या स्थानावर उभे राहून करतात ते स्थान म्हणजे देवर्षी नारदांची कीर्तनाची गादी होय. या कीर्तनाच्या पद्धतींच्या अनेक व्याख्या आणि संकल्पना भरत महामुनींच्या नाट्यशास्त्रापासून केल्या गेल्या. कीर्तनाचा इतिहास- भारतवर्षात नारदमुनींनी कीर्तनाचा आरंभ केला. नारदमुनींनी ते महर्षी व्यासांस शिकवले, व्यास महर्षींनी शुकास शिकवले आणि पुढे त्याचा सर्वत्र प्रसार झाला, अशी कीर्तन परंपरा सांगितली जाते. पुढे ती मराठीत रूजली-

संस्कृताचि गाठी। उघडोनी ज्ञान दृष्टी।।
केलीसे मराठी। गीता देवी।।

वस्तुतः श्रीहरिकीर्तन खेड्यापाड्यात पोहोचले आहे. सर्व लोकांना ईशभक्तीमध्ये रममाण करणे हा कीर्तनाचा उद्देश आहे. अनेक कीर्तनकारांनी त्यांच्या कीर्तनांनी शिवाजी महाराजांच्या काळात व ब्रिटिशांच्या काळात लोकजागृतीचे काम केले. नारदीय कीर्तन अणि वैयासिक कीर्तन- महर्षी व्यासानी सुरू केलेले, असे दोनच कीर्तन प्रकार होते. एक संगीत- नाट्यमय अणि दुसरा गद्यात सांगितला जाणारा असे यातील फरक आहेत. श्रीमद्भगवद् गीतेत नवविधा भक्तीमध्ये कीर्तन ही एक भक्ती असल्याचे वर्णन आहे. नऊ प्रकारांपैकी कीर्तन ही एक भक्ती आहे. कीर्तनाचे गुण संकीर्तन, नामसंकीर्तन, कथा संकीर्तन असे विविध प्रकार आहेत. कीर्त या संस्कृत शद्बावरून कीर्तन हा शब्द आला आहे. पवित्र भगवतगीता ग्रंथराज हा भगवंताचे अणि थोर विभूतींचे गुणगायन करणारा व पराक्रमाचे वर्णन करणारा हा प्राचीन कला प्रकार आहे. नंतरच्या काळात नारदीय कीर्तनातून वारकरी, रामदासी, राष्ट्रीय कीर्तन असे वेगळे संप्रदाय निर्माण झाले. पण संपूर्ण भारतातील कीर्तनात थोडा फार बाह्यरूपात बदल झाला, तरी त्याचा मूळ गाभा कायम राखून आहे. स्वातंत्र्य चळवळीतसुद्धा कीर्तनकारांनी समाजाच्या जागृतीचे उल्लेखनीय कार्य केलेले आहे, मात्र महाराजांनी मानधन घेवू नये. कीर्तन ही खरेतर मूलतः एक भक्ती आहे. श्रीमद् भागवतात सांगितल्याप्रमाणे नवविधा भक्तीपैकी ही दुसरी भक्ती आहे-

श्रवणं कीर्तनं विष्णो: स्मरणं पादसेवनम्!
अर्चनं वन्दनं दास्यं, सख्यं आत्मनिवेदनम!

अशा ९ भक्तीपैकी एक आहे. कीर्तन हे पूर्वी प्रसार, प्रचार, लोकशिक्षण, आणि समाजप्रबोधनाचे एक उत्तम माध्यम होते. काळाच्या ओघात अणि प्रसार माध्यमांच्या प्रगतीमुळे आज कीर्तनाचे महत्त्व कमी झाले असले, तरी आजही धार्मिक उत्सव अणि नित्य उपक्रमांत अणि काही मंदिरांत नियम म्हणून १२ महिने कीर्तन करण्याचा प्रघात आहे. कीर्तनकार कथा सांगत असल्याने त्यांस कथेकरीबुवा असेही म्हणतात. संतशिरोमणी नामदेवजी महाराज म्हणतात-

गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी। ब्रह्मानंद लहरी प्रकट केली।।
अध्यात्म विद्येचे लाविलेसे रोप। चैतन्याचा दीप उजळीला।।
छप्पन्न भाषेचा केलासे गौरव। भवार्णवी नाव उभारीली।।

कीर्तनाची अंगे- वारकरी कीर्तनात पूर्वरंग आणि आख्यान असे दोन वेगळे विभाग नसतात. संतांच्या अभंगाचे गायन आणि त्यावर निरूपण अशा पद्धतीचे आणि टाळ मृदुंगाच्या घोषात २०-२५ साथीदारांसोबत वारकरी कीर्तन सादर केले जाते. वारकरी कीर्तनाची परंपरा खूप पुरातन आहे. मंदिरात सादर होणारे हे कीर्तन संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी चंद्रभागेच्या काठावर आणून जनसामान्यांना खुले करून एक नवी परंपरा सुरू केली. वारकरी कीर्तन हे आळंदी येथे वारकरी महाविद्यालयात शिकविले जाते. या माधमातून संतानी भक्तीमार्ग शिकविला. संत नामदेवांनी वारकरी कीर्तन संस्थेचा पाया घातला. वारकरी कीर्तन ही सांस्कृतिक लोकशाहीची पायाभरणी ठरली-

# केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत 'आनापान' व 'मित्र' उपक्रमाबाबत सविस्तर मार्गदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वडगाव पान केंद्राची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद कोकणगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. परिषदेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या 'आनापान' व 'मित्र' उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शिक्षकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

परिषदेत विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढविणे, मानसिक शांतता, भावनिक संतुलन, सकारात्मक विचारसरणी विकसित करणे आणि आनंददायी शिक्षणाचे वातावरण निर्माण करण्यासाठी 'आनापान' साधनेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच 'मित्र' उपक्रमांतर्गत शाळांमध्ये नियमित सराव, उपक्रमांचे प्रभावी नियोजन, काटेकोर अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख श्रीमती आशा घुले, मुख्याध्यापक एकनाथ साबळे, हरिभाऊ करकंडे तसेच विषयतज्ज्ञ योगेश मोरे, राजू हासे, अनिल कुटे आणि सोमनाथ मदने यांनी उपस्थित शिक्षकांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

या परिषदेला केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिषदेच्या शेवटी सहभागी शिक्षकांनी 'आनापान' व 'मित्र' उपक्रम शाळास्तरावर प्रभावीपणे राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जोर्वे येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी, आण्णाभाऊ साठे व रामनाथ वाघ जयंती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जोर्वे येथील समता विद्या मंदिर व स्व. मधुकरराव संतुजी थोरात कनिष्ठ महाविद्यालयात १ ऑगस्ट रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रामनाथ वाघ यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पर्यवेक्षक विठ्ठल तांबे यांच्या हस्ते तिन्ही महान विभूतींच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य भारत हासे हे होते.

यावेळी शिक्षिका मंजुषा शेवाळे यांनी लोकमान्य टिळक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि रामनाथ वाघ यांच्या जीवनकार्याचा व समाजासाठी दिलेल्या योगदानाचा प्रेरणादायी आढावा घेतला.

यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये प्रभावी भाषणे सादर केली. स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गिते आणि काळुबाई भांगरे यांनी केले. लहान व मोठ्या गटातील विजेत्या स्पर्धकांचा गुलाबपुष्प व पेन देऊन गौरव करण्यात आला.

तिन्ही महान विभूतींच्या स्मरणार्थ पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यालय परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शालिनी नेहे व संदीप कानवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन यशवंत दिघे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मालपाणी विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शारदा शिक्षण संस्थेच्या मातोश्री रुक्मिणीबाई दामोदर मालपाणी विद्यालयाच्या प्राथमिक विभागात १ ऑगस्ट रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सभाधीटपणा वाढावा आणि अभ्यासपूर्ण विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता विकसित व्हावी, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर अभ्यासपूर्ण भाषणे सादर केली. तसेच काही विद्यार्थ्यांनी जोशपूर्ण पोवाडे सादर करून उपस्थितांची



उत्स्फूर्त दाद मिळवली. स्पर्धेचे परीक्षण श्रीमती गोडसे मॅडम यांनी केले. हा उपक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. स्पर्धेच्या आयोजनासाठी सौ. शिंदे मॅडम, सौ. गाडेकर मॅडम, सौ. दारोळे मॅडम आणि श्री. शिंदे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संत इगन्नाथी लोयोला यांचे कार्य सर्व समावेशक - फा. पटेकर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संत इग्नाथी लोयोला यांनी आपल्या सर्व सुखाचा त्याग करून सामाजिक, शैक्षणिक,आरोग्य क्षेत्रातील योगदानाबरोबरच मानवतेच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य समाजाप्रती प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन ज्ञानमाता विद्यालयाचे प्राचार्य फ्रान्सिस पटेकर यांनी केले. संत इग्नाथी लोयोला यांच्या सणानिमित्त ज्ञानमाता विद्यालयात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आर.पी.आय.चे तालुकाध्यक्ष आशिष शेळके, ऑल इंडिया ख्रिश्चन फोरमचे उपसंचालक अनिल भोसले, अ‍ॅड.रवी शेळके, डिस्ट्रिक्ट सुपीरियर फा. जो. गायकवाड, फा. रॉबर्ट डिकोस्टा, फा. प्रशांत शहाराव, फा.नोवेल फर्नांडिस, फा.रोशन बोरुडे,के.डी.भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आशिष शेळके म्हणाले जेज्यूईट संघाचे प्रमुख संत इग्नाथी यांनी वैभवशाली असलेल्या जीवनाचा त्याग करून वंचितांसाठी त्यांनी केलेले कार्य आदर्शवत असून आजचा विद्यार्थी हा उद्याचे भविष्य असल्याने शिक्षक तर विद्यार्थ्यांना घडवतात च परंतु त्याचबरोबर पालकांची सुद्धा जबाबदारी आहे.आज विद्यार्थ्यांनी गुरूंचा आदर करून सोशल मीडिया वर वेळ वाया न घालवता आपला देश घडवणाऱ्या थोर महामानवांना वाचावे ज्ञानमाता विद्यालयातून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी जे यश संपादन केले.त्यांची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी जिद्द व कष्ट करण्याची वृत्ती जोपासली तर आपणही उंच शिखर गाठू शकता असेही यावेळी अनिल भोसले यांनी म्हटले. या कार्यक्रमात विविध विषयामध्ये यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना फा.रॉबर्ट डिकोस्टा यांच्या शिष्वृत्ती निधीतून प्रशस्तिपत्र व शालेय साहित्य देण्यात आले तर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून आपली कला सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी सचिन मुंतोडे,सचिन सोनवणे, सचिन रोहोम, विकास बनसोडे,शारदा नवले,अर्चना डोंगरे,अनिल बोर्डे,संदीप थोरात आदीसह विद्यार्थी, शिक्षक,व पालक वर्ग. मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## बाळूमामा देवस्थानात तब्बल...

धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या देवस्थान शाखेचे निरीक्षक राजेंद्र गडकरी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, संशयितांनी संगनमत करून कारस्थान रचत देवस्थानाचा विश्वासघात केला आणि फसवणुकीद्वारे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वी कोल्हापूर जिल्हा प्रमुख निलोत्पल यांनी पत्रकार परिषदेत या कथित ६०.७५ कोटींच्या गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित करत कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर गुन्हा दाखल झाला असून, आता आर्थिक गुन्हे शाखेकडून या संपूर्ण व्यवहाराचा बारकाईने तपास केला जात आहे. राज्यातील प्रसिद्ध देवस्थानांपैकी एक असलेल्या बाळूमामा मंदिराशी संबंधित हा कथित आर्थिक घोटाळा उघडकीस आल्याने भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

## फसवणूक प्रकरणात राष्ट्रवादी...

नुकतेच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना लक्ष्य केले होते. त्यानंतर पोलिसांनी बाळासाहेब नाहाटा यांना जिल्ह्यातून हद्दपारीची नोटीस देण्यासाठी सोमवारी (३) पोलिस ठाण्यात बोलावून घेतले. नाहाटा पोलिस ठाण्यात गेले, तेव्हा त्यांना पुणे जिल्हा सत्र न्यायालयाच्या वॉरंटनुसार पोलिसांनी अटक करून पुणे पोलिसांच्या ताब्यात दिले.

नाहाटा हे राज्य बाजार समितीचे सभापती आहेत. त्यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. आता त्यांना प्रत्यक्षात अटक करण्यात आल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या गोटात खळबळ उडाली आहे.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५८६/२०२६
दिनांक - २९/०७/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. इरफान शमशुद्दीन मन्सुरी, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १८/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची पती नामे सलीमा बी सय्यद जहूर यांचा **जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक** ०५/०५/१९८६ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/मृत्यू नोंद/५९१/२०२६
दिनांक - २९/०७/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. राणू लक्ष्मण गाढवे, रा. नांदूर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १७/०७/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. नांदूर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची वडील नामे लक्ष्मण सजन गाढवे यांचा **मृत्यू मौजे संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक** १०/११/१९७३ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **मृत्यब** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी नांदूर खंदरमाळ यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी नांदूर खंदरमाळ यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**पाहिजेत**
क्षितिज इलेक्ट्रीकल
घुलेवाडी, ता. संगमनेर
अनुभवी अकाऊंटट पाहिजे - २ जागा
(पुर्णवेळ)
MS Offics Tally
ज्ञान आवश्यक
- संपर्क -
7007608875

**पाहिजेत**
एक पुरुष कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
- संपर्क -
7972999316

**पाहिजेत**
दुकान कामासाठी होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721

**फॅकल्टी पाहिजे**
अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI - 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक - पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बॅंकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727






## दिनविशेष

२०२०: राम मंदिर, अयोध्या — सर्वोच्च न्यायालयाच्या विवादित जमिनीवर मंदिर बांधण्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर भूमिपूजन करण्यात आले.

२०१९: भारत — जम्मू आणि काश्मीर या परदेशाला राज्यचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू आणि काश्मीर, व लडाख असे विभाजन करण्यात आले.

१९७३: मार्स ६ — अंतराळयान यूएसएसआर वरून प्रक्षेपित झाले.

१९६५: १९६५ चे भारत-पाकिस्तान युद्ध — पाकिस्तानी सैनिकांनी स्थानिकांचा वेष घालून घुसकोरी केल्यामुळे युद्ध सुरु झाले.

१९६३: शीतयुद्ध — आंशिक आण्विक चाचणी बंदी करार: अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सोव्हिएत युनियनने स्वाक्षरी केली.

१९६२: नेल्सन मंडेला — यांना तुरुंगात टाकण्यात आले.११९० पर्यंत सुटका होणार नव्हती.

१९६२: मर्लिन मनरो — अमेरिकन अभिनेत्री, त्यांच्या राहत्या घरात ड्रग्जच्या अतिसेवनामुळे मृतावस्थेत सापडल्या.

## जन्म

१९८७: जेनेलिया डिसोझा — भारतीय अभिनेत्री

१९७४: काजोल — भारतीय अभिनेत्री — पद्मश्री

१९७२: अकिब जावेद — पाकिस्तानी क्रिकेटपटू

१९७१: वाल्डिस डोम्ब्रोव्स्कीस — लॅटव्हिया देशाचे ११वे पंतप्रधान, शैक्षणिक आणि राजकारणी

१९६९: वेंकटेश प्रसाद — जलदगती गोलंदाज

१९५०: महेंद्र कर्मा — भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: २५ मे २०१३ )

१९४७: टोनी ओपाथा — श्रीलंकेचे क्रिकेटर (निधन: ११ सप्टेंबर २०२० )

१९४२: जो बॉयड — अमेरिकन रेकॉर्ड निर्माते, हॅनिबल रेकॉर्ड्सचे संस्थापक

१९३३: विजया राजाध्यक्ष — लेखिका व समीक्षिका

१९३०: नील आर्मस्ट्राँग — चंद्रावर पाऊल ठेवलेले पहिले मनुष्य, अमेरिकन अंतराळवीर

## मृत्यू

२०२२: देबी घोसाल — भारतीय राजकारणी, खासदार (जन्म: १ नोव्हेंबर १९३४ )

२०२२: गोरिमा हजारिका — भारतीय नृत्यांगना

२०२२: नरेंदर थापा — भारतीय फुटबॉलपटू (जन्म: २२ सप्टेंबर १९६४ )

२०१९: टोनी मॉरिसन — अमेरिकन लेखक, — नोबेल, पुलित्झर पुरस्कार (जन्म: १८ फेब्रुवारी १९३१ )

२०१४: चापमॅन पिंचर — भारतीय-इंग्रजी इतिहासकार, पत्रकार आणि लेखक (जन्म: २९ मार्च १९१४ )

२०१४: प्राण कुमार शर्मा — भारतीय व्यंगचित्रकार (जन्म: १५ ऑगस्ट १९३८ )

२०११: आंद्रेज लेपर — पोलंड देशाचे उपपंतप्रधान, शेतकरी आणि राजकारणी (जन्म: १३ जून १९५४ )

२००१: ज्योत्स्ना भोळे — गानसम्राज्ञी, गायिका आणि अभिनेत्री — लता मंगेशकर पुरस्कार (जन्म: ११ मे १९१४ )

२००१: ओटेमा अल्लिमादी — युगांडा देशाचे २रे पंतप्रधान, राजकारणी (जन्म: ११ फेब्रुवारी

२०००: लाला अमरनाथ भारद्वाज — स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०५ ऑगस्ट**

# जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा रद्द – ऐतिहासिक निर्णय

५ ऑगस्ट २०१९ रोजी भारत सरकारने देशाच्या राजकीय आणि घटनात्मक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत जम्मू आणि काश्मीरला भारतीय संविधानाच्या कलम ३७० अंतर्गत मिळालेला विशेष दर्जा रद्द केला. याचबरोबर कलम ३५अ देखील रद्द करण्यात आले. या निर्णयामुळे जम्मू आणि काश्मीरला इतर राज्यांप्रमाणेच भारतीय संविधानातील सर्व कायदे लागू झाले.या निर्णयानंतर जम्मू आणि काश्मीर पुनर्गठन कायदा, २०१९ लागू करण्यात आला. त्यानुसार पूर्वीच्या जम्मू आणि काश्मीर राज्याचे दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन करण्यात आले. जम्मू आणि काश्मीर हा विधानसभेसह केंद्रशासित प्रदेश ठरविण्यात आला, तर लडाख हा विधानसभा नसलेला स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश बनविण्यात आला. हा बदल ३१ ऑक्टोबर २०१९ पासून अमलात आला.सरकारने या निर्णयामागे राष्ट्रीय एकात्मता मजबूत करणे, दहशतवादावर नियंत्रण मिळवणे, विकासाला चालना देणे आणि केंद्र सरकारच्या सर्व योजना व कायदे थेट लागू करणे हे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. यानंतर शिक्षण, आरोग्य, उद्योग, गुंतवणूक, सामाजिक न्याय आणि महिला तसेच अनुसूचित जाती-जमातींशी संबंधित अनेक केंद्रीय




कायदे जम्मू-काश्मीरमध्ये लागू झाले.मात्र या निर्णयावर देशभरात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रतिक्रिया उमटल्या. समर्थकांनी हा निर्णय ऐतिहासिक आणि देशाच्या एकात्मतेसाठी आवश्यक असल्याचे म्हटले, तर विरोधकांनी राज्याचा दर्जा काढून घेणे, स्थानिक लोकांशी पुरेशी चर्चा न करणे आणि त्यानंतर लादण्यात आलेले निर्बंध यावर टीका केली.एकंदरीत, ५ ऑगस्ट २०१९ हा दिवस भारताच्या घटनात्मक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या निर्णयामुळे जम्मू आणि काश्मीरच्या प्रशासकीय, राजकीय आणि विकासात्मक व्यवस्थेत मोठे बदल झाले आणि केंद्रशासित प्रदेशांच्या स्वरूपात नवीन प्रशासकीय रचना अस्तित्वात आली.

# लाला अमरनाथ भारद्वाज यांना क्रिकेटविश्वाचा अखेरचा निरोप

**पुण्यतिथी विशेष**

लाला अमरनाथ भारद्वाज हे भारतीय क्रिकेट इतिहासातील एक अत्यंत मानाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा जन्म ११ सप्टेंबर १९११ रोजी पंजाबमधील कपूरथला येथे झाला. ते भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये शतक झळकावणारे पहिले भारतीय फलंदाज होते. १९३३ मध्ये इंग्लंडविरुद्ध मुंबईतील कसोटी सामन्यात त्यांनी ११८ धावांची ऐतिहासिक खेळी करत भारतीय क्रिकेटमध्ये नवा अध्याय लिहिला.भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या पहिल्या अधिकृत कसोटी मालिकेत स्वतंत्र भारताच्या पहिल्या कसोटी क्रिकेट संघाचे कर्णधार म्हणून लाला अमरनाथ यांची निवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने नव्या आत्मविश्वासाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वाटचाल सुरू केली. त्यांचे नेतृत्व, आक्रमक खेळ आणि संघभावना यामुळे भारतीय क्रिकेटला नवी दिशा मिळाली.लाला अमरनाथ हे उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू होते. फलंदाजीबरोबरच ते प्रभावी मध्यमगती गोलंदाज होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत २४ कसोटी सामने खेळून ८७८ धावा आणि ४५ बळी मिळवले. मैदानावरील त्यांचा लढाऊ स्वभाव आणि विजयाची जिद्द यामुळे ते क्रिकेटप्रेमींच्या मनात विशेष स्थान मिळवून गेले.खेळाडू म्हणून निवृत्तीनंतरही त्यांनी भारतीय क्रिकेटसाठी मोठे योगदान दिले. ते राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष, प्रशिक्षक आणि समालोचक म्हणूनही कार्यरत होते. अनेक युवा खेळाडूंना त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे पुत्र सुरिंदर अमरनाथ, मोहिंदर अमरनाथ आणि राजिंदर अमरनाथ यांनीही भारतीय



क्रिकेटमध्ये आपली छाप पाडली. विशेषतः मोहिंदर अमरनाथ यांनी १९८३ च्या विश्वचषक विजयात मोलाची भूमिका बजावली.५ ऑगस्ट २००० रोजी लाला अमरनाथ यांचे वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रिकेटने एक महान खेळाडू, दूरदृष्टी असलेला नेता आणि प्रेरणादायी मार्गदर्शक गमावला. भारतीय क्रिकेटच्या पायाभरणीत त्यांचे योगदान आजही अमूल्य मानले जाते.लाला अमरनाथ यांचे नाव भारतीय क्रिकेटच्या इतिहासात कायम आदराने घेतले जाते. त्यांच्या कर्तृत्वामुळे भारतीय क्रिकेटला जागतिक स्तरावर ओळख मिळविण्याचा मजबूत पाया तयार झाला. त्यामुळे ते भारतीय क्रिकेटचे खरे शिल्पकार आणि स्वतंत्र भारताच्या क्रिकेट इतिहासातील पहिले महान कर्णधार म्हणून सदैव स्मरणात राहतील.

# मुकुंद चिलवंत यांनी स्वीकारला अहिल्यानगर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयाच्या जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार मुकुंद चिलवंत यांनी आज स्वीकारला. यानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात साध्या पण उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.

मुकुंद चिलवंत यांना माहिती व जनसंपर्क विभागातील विविध स्तरांवर काम करण्याचा समृद्ध अनुभव आहे. मंत्रालय, मुंबई येथील वृत्तचित्र शाखेत कार्यरत असताना त्यांनी शासनाच्या विविध विकासात्मक उपक्रमांचे प्रभावी दृकश्राव्य दस्तावेजीकरण, जनजागृतीपर माहितीपट निर्मिती तसेच जनसंपर्कविषयक विविध उपक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. अहिल्यानगर येथे पदभार स्वीकारण्यापूर्वी ते सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या प्रशासकीय अनुभवामुळे तसेच प्रभावी संवादकौशल्यामुळे शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यभार स्वीकारल्यानंतर श्री. चिलवंत यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत अधिक वेगाने, अचूकपणे व परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच प्रसारमाध्यमांशी सुसंवाद राखत माहिती विभागाची विश्वासार्हता अधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी मावळते माहिती अधिकारी अमोल महाजन यांनी श्री. चिलवंत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही त्यांचे स्वागत करून नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# वडगावपान सेवा सहकारी सोसायटीचा नाबार्डकडून गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - लोकनेते बाळासाहेब थोरात व सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष प्रतापराव (बाबा) ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणाऱ्या व तालुक्यात प्रतिष्ठेचे समजल्या जाणाऱ्या वडगाव पान सेवा सहकारी सोसायटीस नाबार्डतर्फे उत्कृष्ट सहकार हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. पुणे येथे शानदार कार्यक्रमात हा पुरस्कार वडगाव पान सेवा सोसायटीस प्रदान करण्यात आला. यावेळी चेअरमन आबासाहेब थोरात, सचिव मोहन पवार , नाबार्डचे अधिकारी डॉ ए के सुध , डॉ अनास्कर , डॉ ए व्ही भवानीशंकर , अविनाश



शेवाळकर, श्रीमती स्मृती भागत आदींसह मान्यवर उपस्थित होते. नाबार्ड ही सरकारची प्रमुख विकास वित्तीय संस्था आहे. ग्रामीण विकास शेती व सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी नाबार्ड सातत्याने कार्यरत आहे. त्या अंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या विविध संस्थांचा नाबार्डच्या वतीने सन्मान सत्कार करण्यात येत असतो. ग्रामीण विकास सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य पारदर्शक कारभार व सभासदाभिमुख सेवा याबद्दल वडगाव पानसेवा सहकारी सोसायटीस नाबार्डच्या वतीने हा उत्कृष्ट सहकार पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार वडगाव पान सेवा सहकारी सोसायटीला मिळाल्याबद्दल लोकनेते बाळासाहेब थोरात, मा आमदार डॉ.सुधीरजी तांबे, आ. सत्यजित तांबे, इंद्रजीत भाऊ थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात, बाबा ओहोळ आदींनी संचालक मंडळाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

# संगमनेरमध्ये कथित पाकिस्तानी ‘गोरी’ क्रीम विक्रीप्रकरणी संगमनेर शहर शिवसेना आक्रमक; तीव्र आंदोलनाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील एका व्यावसायिक आस्थापनामध्ये कथितरित्या पाकिस्तानमध्ये उत्पादित करण्यात आलेल्या ‘गोरी’ ब्रँडच्या ब्युटी क्रीम विक्रीसाठी उपलब्ध असल्याची माहिती समोर आल्यानंतर शहरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत शिवसेना शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी यांनी संबंधित उत्पादनांची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच हे प्रकरण उघडकीस आणल्याबद्दल संगमनेर शहर पोलिसांचे विशेष अभिनंदनही त्यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात सूर्यवंशी यांनी म्हटले आहे की, देशाच्या सुरक्षेशी, स्वाभिमानाशी आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित कोणत्याही बाबतीत तडजोड केली जाणार नाही. कथितरित्या पाकिस्तानमध्ये उत्पादित करण्यात आलेल्या उत्पादनांची विक्री होत असल्याचा संशय अत्यंत गंभीर असून यामागील संपूर्ण साखळीचा तपास होणे आवश्यक आहे. सदर ‘गोरी’ क्रीमबाबत विविध माध्यमांतून आणि तज्ज्ञांकडून वेळोवेळी आरोग्यविषयक गंभीर चिंता व्यक्त करण्यात आल्या आहेत. काही अहवालांनुसार अशा प्रकारच्या त्वचा गोरी करणाऱ्या उत्पादनांमध्ये घातक रसायने आढळण्याची शक्यता असते. त्यामुळे त्वचारोग, ॲलर्जी, त्वचेचे कायमस्वरूपी नुकसान तसेच दीर्घकाळ वापरामुळे मूत्रपिंड (किडनी) आणि इतर अवयवांवर दुष्परिणाम होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा उत्पादनांची विक्री होत असल्यास त्याची सखोल चौकशी होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

सूर्यवंशी म्हणाले की, संगमनेरसारख्या शहरामध्ये अशा संशयित उत्पादनांची विक्री होत असल्याची बाब चिंताजनक आहे. संबंधित उत्पादनांची आयात प्रक्रिया, विक्रीसाठी आवश्यक परवानग्या, गुणवत्ता प्रमाणपत्रे, वितरण साखळी आणि कायदेशीर बाबींची अन्न व औषध प्रशासनाने तातडीने तपासणी करावी. तसेच चौकशी अहवाल जनतेसमोर जाहीर करण्यात यावा. यावेळी त्यांनी संगमनेर शहर पोलिसांचे अभिनंदन करताना सांगितले की, सदर प्रकरण उघडकीस आणून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल संगमनेर शहर पोलिसांचे अभिनंदन करावे तेवढे कमी आहे. कायद्याची अंमलबजावणी आणि जनहिताचे संरक्षण करण्यासाठी पोलिसांनी दाखविलेली तत्परता कौतुकास्पद आहे.

शिवसेना शहर प्रमुखांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. प्रशासनाने वेळकाढूपणा केल्यास शिवसेना सर्व हिंदुत्ववादी संघटनांना सोबत घेऊन तीव्र लोकआंदोलन उभारेल. जनतेच्या आरोग्याशी आणि राष्ट्रीय हिताशी संबंधित प्रश्नांवर शिवसेना शांत बसणार नाही. संगमनेर शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न, कायद्याची अंमलबजावणी आणि जनहित लक्षात घेता प्रशासनाने तातडीने कारवाई करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात निवेदनाच्या प्रती आ. अमोल खताळ पाटील, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई तसेच पोलिस अधीक्षक, अहिल्यानगर यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याचेही श्री. सूर्यवंशी यांनी सांगितले.

# महाराष्ट्रात पावसाचा जोर पुन्हा वाढणार

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून पुढील तीन दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राच्या ताज्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, कोकण-गोवा किनारपट्टीवरील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी जोरदार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. पावसाचा वाढता जोर लक्षात घेऊन काही जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.रायगड, रत्नागिरी, पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा घाट परिसर तसेच विदर्भातील अकोला, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि वर्धा जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. याशिवाय रत्नागिरी, सातारा घाट परिसर, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांमध्येही आज पावसाचा जोर वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकणातील बहुतांश भागांत पावसाच्या सरी कायम राहतील.

